1 6 MAR 2022 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महावीर अध्यासनाला मुनी चंद्रसागर करणार मदत

## विद्यापीठाला सदिच्छा भेट : ज्योतिषशास्त्र पुस्तकांची केली पाहणी

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

जैन मुनी अभिनंदन चंद्रसागर हे महाराष्ट्राचा विहार करत आहेत. कोल्हापूर भेटीस आल्यानंतर त्यांनी शिवाजी विद्यापीठाला सदिच्छा भेट दिली. भगवान महावीर अध्यासनाच्या कार्याची माहिती घेत अध्यासनाला सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांचे स्वागत केले.

जैन मुनी अभिनंदन चंद्रसागर यांचा ध्यान विषयाचा अभ्यास आहे. ज्योतिषशास्त्र अभ्यासाची त्यांना रूची असल्याने त्यांनी विद्यापीठातील ग्रंथालयात हस्तलिखित ज्योतिषशास्त्र पुस्तकांची पाहणी केली. डॉ. नमिता खेत यांनी त्यांना ग्रंथालयाची माहिती दिली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाला सदिच्छा भेट दिल्यानंतर जैन मुनी अभिनंदन चंद्रसागर यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना 'ध्यानामृत' पुस्तक भेट दिले. सोबत डॉ. विजय ककडे, श्री बालमुनी राजेश ओसवाल.**

यावेळी मुनींनी कुलगुरूंना 'ध्यानामृत' ग्रंथ भेट दिला. जैन अध्यासन आंतरराष्ट्रीय करण्यासाठी जिनसूत्र व्याख्यानमाला सुरू केली जाणार आहे.

यामध्ये पहिले व्याख्यान मुनी चंद्रसागर यांचे असणार आहे, या व्याख्यानाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यासनाचे संचालक डॉ. विजय ककडे यांनी केले. यावेळी श्री बालमुनी, श्री संभवनाथ जैन श्वेतांबर मंदिर ट्रस्टचे उपाध्यक्ष राजेश ओसवाल उपस्थित होते.

16 MAR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा क्युबा सरकारसमवेत सामंजस्य करार

## जागतिक शाश्वत विकासाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल : अदिलैदिस बार्सनाज

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठासमवेत क्युबा येथील विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण मंत्रालयाच्या रेशीम संशोधनविषयक झालेल्या सामंजस्य कराराच्या माध्यमातून जागतिक शाश्वत विकासाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले गेले आहे, असे प्रतिपादन क्युबाच्या राष्ट्रीय रेशीम प्रकल्पाच्या संचालिका अदिलैदिस रुईझ बार्सनाज यांनी केले.

क्युबा सरकारच्या विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण मंत्रालयाचे सेंटर फॉर रिसर्च इन प्रोटीन प्लँट्स अँड बायोनॅचरल प्रोडक्ट्स व शिवाजी विद्यापीठ यांच्यात नुकताच रेशीम प्रकल्पविषयक सामंजस्य करार झाला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी शैक्षणिक व संशोधकीय आदान-प्रदानाबरोबरच रेशीम शेती क्षेत्रातील शाश्वत संशोधन व विकास दृष्टीने उपयुक्त असे तंत्रज्ञान सामंजस्य करारातून साकार व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी सामंजस्य करारावर विद्यापीठातर्फे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी तर क्युबा सरकारतर्फे बार्सनाज यांनी स्वाक्षरी केली. यावेळी क्युबाचे संशोधन कार्लोस डेव्हिड रुझ मेसा, प्राणिशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आशिष देशमुख, आंतरराष्ट्रीय व्यवहार कक्षाचे समन्वयक डॉ. अनिल घुले उपस्थित होते.



**कोल्हापूर : क्युबा सरकार व शिवाजी विद्यापीठ यांच्यादरम्यान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार झाला. याप्रसंगी डॉ. ए. डी. जाधव, डॉ. पी. एस. पाटील, अदिलैदिस रुईझ बार्सनाज आदी.**

सामंजस्य करार २०२२ ते २०२७ असा असणार आहे. याअंतर्गत दोन्ही संस्थांकडून शैक्षणिक व संशोधकीय कार्यक्रम नियमितपणे राबविला जाईल. रेशीमशास्त्राअंतर्गत नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचे आदानप्रदान तसेच तुती, रेशीम कीटक, संगोपन तंत्रज्ञान, जैविक खते, मित्र कीड आणि रोग, मूल्यवर्धित उत्पादने, रियाकलिंग ऑफ सेरीकल्चर वेस्ट या अनुषंगाने संशोधनास चालना देण्यात येईल.

क्युबाचे तत्कालीन राष्ट्रपती फिडेल कॅस्ट्रो यांनी शिवाजी विद्यापीठातील डॉ. ए. डी. जाधव यांची क्युबाच्या राष्ट्रीय रेशीम प्रकल्पाचे सल्लागार म्हणून नियुक्ती केली. तेव्हापासून डॉ. जाधव गेली दहा वर्षे प्रामाणिकपणे काम करीत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून क्युबा सरकारने त्यांचा 'इनोव्हेशन २०२१' पुरस्काराने गौरव केला.

हा पुरस्कार डॉ. जाधव यांच्यावतीने डॉ. बार्सनाज यांनी स्वीकारला होता. तो त्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत त्यांना प्रदान केला.

लोकमत



कोल्हापुरात रविवारी शाहू स्मारक भवनमध्ये ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या हस्ते डॉ. अरुण भोसले यांच्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी व्यासपीठावर डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. रमेश जाधव, डॉ. रणधीर शिंदे, दत्तात्रय पास्ते, भारतभूषण माळी उपस्थित होते.

# चळवळीच्या अभ्यासासाठी भोसले यांचे पुस्तक वटवृक्ष

## डॉ. जयसिंगराव पवार : पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राजकीय व सामाजिक चळवळीत योगदान, व्यक्तीच्या कर्तृत्वाची संशोधनपर मांडणी करणारे डॉ. अरुण भोसले लिखित 'दक्षिण महाराष्ट्र : राजकीय चळवळी व नेतृत्व' हे पुस्तक चळवळीचा अभ्यास करण्यासाठी वटवृक्ष ठरेल, असा आशावाद ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी व्यक्त केला.

डायमंड प्रकाशनतर्फे प्रकाशित व शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. अरुण भोसले लिखित दक्षिण महाराष्ट्र : राजकीय चळवळी व नेतृत्व या पुस्तकाचे प्रकाशन रविवारी शाहू स्मारक भवनमध्ये झाले. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. पवार यांनी विसाव्या शतकातील थोर व्यक्तींच्या चरित्रांची आणि कार्याची संशोधनात्मक मांडणी करण्याचे काम लेखक म्हणून भोसले यांनी चांगल्या प्रकारे केले आहे. त्यांचे हे कार्य येणाऱ्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल. अनेक विद्यार्थ्यांना चळवळींचा अभ्यास करण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल, असे सांगितले.

पुस्तक लेखनाचा प्रवास सांगताना डॉ. अरुण भोसले यांनी दक्षिण महाराष्ट्रात घडलेल्या चळवळींचा या शतकातील अभ्यास करताना त्याची तुलना राष्ट्रीय चळवळीशी करता येईल का हे तपासले आणि त्यातून एक संशोधनपर पुस्तक आकाराला आल्याचे सांगितले. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, प्रा. अवनिश पाटील, डॉ. रमेश जाधव, भारतभूषण माळी, दत्तात्रय पास्ते उपस्थित होते.

16 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत विकासाच्या दिशेने पाऊल

## बार्सनाज; क्युबा सरकार, विद्यापीठात रेशीम संशोधनविषयक सामंजस्य करार

**टेंबलाईवाडी, ता. १५ :** येथील शिवाजी विद्यापीठाबरोबर क्युबा येथील विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण मंत्रालयाच्या रेशीम संशोधनविषयक झालेल्या सामंजस्य कराराच्या माध्यमातून जागतिक शाश्वत विकासाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे, असे प्रतिपादन क्युबाच्या राष्ट्रीय रेशीम प्रकल्पाच्या संचालिका अदिलैदिस रुईझ बार्सनाज यांनी येथे केले.



**क्युबा सरकार व शिवाजी विद्यापीठ यांच्यात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार झाला. या वेळी डॉ. ए. डी. जाधव, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्युबन सेंटरच्या संचालिका अदिलैदिस रुईझ बार्सनेज, कार्लोस डेव्हिडरुझ मेसा, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.**



क्युबा सरकारच्या विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण मंत्रालयाचे सेंटर फॉर रिसर्च इन प्रोटीन प्लँट्स अँड बोनॅचरल प्रोडक्ट्स व शिवाजी विद्यापीठ यांच्यात नुकताच रेशीम प्रकल्पविषयक सामंजस्य करार झाला. त्यावेळी त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

शबार्सनाज म्हणाल्या, "यापूर्वी क्युबा सरकारसमवेत २०१३ ते २०१८ दरम्यान विद्यापीठाचा करार होता. त्याअंतर्गत दोन्ही संस्थांमध्ये रेशीम शेतीच्या अनुषंगाने अतिशय उत्तम संशोधन कार्य झाले. नव्या सामंजस्य कराराअंतर्गतही अशाच स्वरुपाचे भरीव संशोधन व शाश्वत विकासाचे कार्य साकार होईल."

सामंजस्य करारावर प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व बार्सनाज यांनी स्वाक्षरी केली. क्युबाचे तत्कालीन राष्ट्रपती फिडेल कॅस्ट्रो यांनी विद्यापीठातीलडॉ. ए. डी. जाधव यांची क्युबाच्या राष्ट्रीय रेशीम प्रकल्पाचे सल्लागार म्हणून नियुक्ती केली. डॉ. जाधव दहा वर्षे प्रामाणिकपणे काम करत आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून क्युबा सरकारने त्यांचा 'इनोव्हेशन २०२१' पुरस्काराने गौरव केला. हा पुरस्कार डॉ. जाधव यांच्या वतीने डॉ. बार्सनाज यांनी स्वीकारला होता. तो त्यांनी जाधव यांना प्रदान केला. संशोधक कार्लोस डेव्हिडरुझ मेसा, प्राणीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आशिष देशमुख उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
1 6 MAR 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रेशीम संशोधनात विद्यापीठाचे पुढचे पाऊल

## क्युबा रेशीम प्रकल्पाच्या संचालिका अदिलैदिस रुईस बार्सनाज यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठासमवेत क्युबा येथील विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण मंत्रालयाच्या रेशीम संशोधनविषयक झालेल्या सामंजस्य कराराच्या माध्यमातून जागतिक शाश्वत विकासाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे, असे प्रतिपादन क्युबाच्या राष्ट्रीय रेशीम प्रकल्पाच्या संचालिका अदिलैदिस रुईझ बार्सनाज यांनी केले.

क्युबा सरकारच्या विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण मंत्रालयाचे 'सेंटर फॉर रिसर्च इन प्रोटीन प्लँट्स अँड बोनॅचरल प्रोडक्ट्स' आणि शिवाजी विद्यापीठात रेशीम प्रकल्पविषयक सामंजस्य करार झाला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : क्युबा सरकारचा 'इनोव्हेशन' पुरस्कार शिवाजी विद्यापीठातील रेशीमशास्त्र विभागाचे डॉ. ए. डी. जाधव यांना प्रदान करताना अदिलादैस रुईझ बार्सनाज व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, संशोधक कार्लोस डेव्हिडरुझ मेसा, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.**

### असा आहे सामंजस्य करार...

सामंजस्य करार २०२२ ते २०२७ असा पंचवार्षिक आहे. दोन्ही संस्थांकडून शैक्षणिक व संशोधकीय कार्यक्रम राबवले जातील. रेशीमशास्त्राअंतर्गत नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचे आदानप्रदान तसेच तुती, रेशीम कीटक, संगोपन तंत्रज्ञान, जैविक खते, मित्र कीड आणि रोग, मूल्यवर्धिक उत्पादने, रियाकलिंग ऑफ सेरीकल्चर वेस्ट इत्यादींच्या अनुषंगाने संशोधनास चालना मिळेल. तुती, रेशीम कीटक, वाणांचे आदानप्रदान यांसह दोन्ही देशांसाठी उपयुक्त तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी दोन्ही देशांतील शास्त्रज्ञ-तंत्रज्ञांच्या भेटींचे आयोजन केले जाईल.

### डॉ. ए. डी. जाधव यांना पुरस्कार प्रदान

क्युबाचे तत्कालीन राष्ट्रपती फिडेल कॅस्ट्रो यांनी शिवाजी विद्यापीठातील डॉ. ए. डी. जाधव यांची क्युबाच्या राष्ट्रीय रेशीम प्रकल्पाचे सल्लागार म्हणून नियुक्ती केली. क्युबा सरकारने त्यांचा 'इनोव्हेशन २०२१' पुरस्काराने गौरव केला. हा पुरस्कार डॉ. जाधव यांच्यावतीने डॉ. बार्सनाज यांनी स्वीकारला होता. तो त्यांना प्रदान केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 MAR 2022 पुण्यनगरी

# भारती विद्यापीठात कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी येथे शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत फार्मसी महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी 'इनोव्हेशन अॅण्ड इनक्युबेशन इन अॅकॅडीमिया' या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळा झाली. याचे उद्घाटन विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा, कार्यशाळेचे मुख्य समन्वयक डॉ. एन. आर. जाधव यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, संशोधनाने आत्मसात केलेल्या नवनवीन संकल्पनांचे पृथ्थकरण करणे गरजेचे आहे. प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे म्हणाले, संशोधन समाजासाठी उपयुक्त असायला हवे. कार्यशाळेत बहुसंख्य प्राध्यापक, संशोधक सहभागी झाले होते.



**कोल्हापूर : भारती विद्यापीठातील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे आदी.**

तरूण भारत

# संशोधनात नवीन संकल्पना आत्मसात करा

प्रतिनिधी
कोल्हापूर

■ शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन

औषधनिर्माणशास्त्रामध्ये नवनवीन संकल्पना आत्मसात करून त्यांचे उद्योगामध्ये परीवर्तीत होण्यासाठी विविध संधी आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी कॉलेजमध्ये अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत 'इनोव्हेशन ॲण्ड इनक्युबेशन इन ॲकॅडीमिया" या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मोरे होते.

प्र–कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, नवनवीन संकल्पना प्रत्यक्षात उरण्यासाठी संकल्पनांचे पृथकरण करून नवनवीन प्रॉडक्ट व त्यांचे बाजारामध्ये असलेल्या मागणीनुसार पुरवठा यांच्या स्थितीची चाचणी करणे गरजेचे आहे. शिक्षकांनी संधीचा फायदा करून घेण्यासाठी व इनोव्हेशन, इन्क्युबेशन व स्टार्टअप या संबंधी आपले ज्ञान अद्ययावत करण्याची गरज आहे. अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. मोरे म्हणाले, संशोधन जर्नलमध्ये प्रकाशित करून त्यावर पेटंट मिळवले पाहिजे. तसेच आपले संशोधन समाजोपयोगी असले पाहिजे. या कार्यशाळेत शंभर शिक्षकांनी सहभाग नोंदवला. यावेळी डॉ. एम. एस. देशमुख, अपेक्स एक्सलेटरचे व्यवस्थापक सचिन कुंभोजे, मोलेकेम लॅबचे व्यवस्थापक विशाल दड्डीकर, इन्क्युबेशन केंद्राचे जयंत पवार, मिटकॉनचे प्रिया पाटील, सुर्यकांत दोडमिसे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. एन. आर. जाधव, डॉ. डॉन डिसोजा, डॉ. डी. ए. भागवत, डॉ. आर. एस. बगली, डॉ. एस. जी. किल्लेदार आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : कार्यशाळेचे उदघाटन करताना शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. एच. एन. मोरे, डॉ. एम. एस. देशमुख, सचिन कुंभोजे, जयंत पवार, डॉ. एन. आर. जाधव आदी.**

तरूण भारत

# देशाच्या प्रगतीत महिला उद्योजकांचे योगदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

- कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांचे प्रतिपादन
- मनोहारी मनोयुवा" महिला विशेषांकाचे प्रकाशन

आधुनिक युगात महिलांनी साधलेली प्रगती अभिमानास्पद आहे. प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. देशाच्या शाश्वत प्रगतीमध्ये महिला उद्योजकांचे योगदान महत्त्वाचे असणार आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी आज येथे केले.

विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम)– फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल फेस्कॉम प्रादेशिक विभाग, सांगली आणि कोल्हापूर व सावित्रीबाई फुले ज्येष्ठ महिला नागरिक सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने महिलासांठी उद्योग प्रदर्शनाचे आयोजन केले होते. उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

निवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश ऊर्मिला जोशी म्हणाल्या, भारतीय राज्यघटनेनेच महिलांना त्यांचे सर्व अधिकार प्रदान केले आहेत. त्यामुळे इतर देशांच्या तुलनेत भारतीय महिलांना त्यांचे हक्क मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागला नाही. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रभारी संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा जोशी यांच्या हस्ते गौरव केला. फेस्कॉमच्या 'मनोहारी मनोयुवा" महिला दिन विशेषांकाचे प्रकाशन झाले. स्वागत व प्रास्ताविक डॉ. सुशीला ओडियार यांनी केले. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. सविता मोरे यांनी आभार मानले.

पुढारी

# 'ई-लर्निंगमध्ये करिअर निवडीच्या संधी'

कोल्हापूर : कोरोनामुळे पारंपरिक शिक्षणापेक्षा ई-लर्निंगच्या वापरात वाढ झाली आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षण अधिक परस्परसंवादी व मनोरंजक बनविण्यासाठी ॲप, मीडिया व तंत्रज्ञान शिक्षणात ई-क्रांती घडवून आणत आहे. यात शिकणारा वर्ग वाढत असल्याने युवकांना करिअरच्या अनेक संधी आहेत, असे प्रतिपादन 'बायजूचे' सहायक व्यवस्थापक अजित पवार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या एम.बी.ए. विभाग व सेंट्रल प्लेसमेंटस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रोजगार मेळाव्यात ते बोलत होते. वाणिज्य व्यवस्थापन विद्या शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविक डॉ. अनुप मुळे व डॉ. रामदास बोलके यांनी आभार मानले. यावेळी डॉ.गंधाली खारगे, प्रमोद सामुद्रे आदी उपस्थित होते.

लोकसत्ता

# डॉ. डी. वाय. पाटील यांना कणबरकर पुरस्कार जाहीर

लोकसत्ता प्रतिनिधी



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा प्रतिष्ठेचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर राष्ट्रीय पुरस्कार शैक्षणिक विकासात महत्त्वाचे योगदान देणारे डॉ. डी. वाय. पाटील यांना १३ एप्रिल रोजी प्रदान करण्यात येणार आहे, अशी घोषणा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केली. १ लाख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य रा.कृ. कणबरकर यांच्या · स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार निर्मितीसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी विद्यापीठाकडे २५ लाख रुपयांची ठेव प्रदान केली आहे. त्यातून देशातील विविध क्षेत्रांत अत्युत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तीला दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो. ज्येष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी.एन.आर. राव, रयत शिक्षण संस्था, ज्येष्ठ निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन.डी. पाटील यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. डॉ. डी. वाय. पाटील यांनी व्यावसायिक शिक्षणाचा विकास व विस्तार यांसाठी परिश्रम घेतल्याने त्यांच्या समूहाचा शैक्षणिक वृक्ष साकारला आहे, असे शिर्के यांनी सांगितले.

1 6 MAR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविश्वविद्यालय महिला कुस्तीत नंदिनी साळोखेला सुवर्ण

## शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात महिला कुस्तीतील पहिले सुवर्ण; लोकनेते सदाशिवराव मंडलिक राष्ट्रीय कुस्ती संकुलाची मल्ल



नंदिनी साळोखे

**मुरगूड : प्रतिनिधी**

भिवानी (हरियाणा) येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविश्वविद्यालय महिला कुस्ती स्पर्धेत लोकनेते सदाशिवराव मंडलिक राष्ट्रीय संकुलाच्या नंदिनी बाजीराव साळोखे हिने ५० किलो वजन गटामध्ये शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना सुवर्णपदकाला गवसणी घातली. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात महिला कुस्तीत हे पहिलेच सुवर्णपदक नंदिनीच्या रूपाने मिळाले आहे.

अंतिम फेरीत लवली विद्यापीठ पंजाबच्या आंतरराष्ट्रीय पदक विजेत्या सिमरनवर १३-२ अशा गुणफरकाने एकतर्फी विजय मिळवून नंदिनी सुवर्णपदकाची मानकरी ठरली. उपांत्य फेरीत नंदिनीने एमडी विद्यापीठ रोहतकच्या आंतरराष्ट्रीय पदक विजेत्या ज्योतीवर अटीतटीच्या लढतीत ढाक डावावर मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला होता. तत्पूर्वी नंदिनीने व्हीकेएस विद्यापीठ बिहारच्या अंतिमा कुमारी, पंजाब विद्यापीठाच्या कमलदीप कौर, एमडीएस विद्यापीठ अजमेरच्या संगीता हिला, तसेच पुणे विद्यापीठाच्या रूपाली आडसुळे यांना पराभूत केले आहे. नंदिनी ही देवचंद कॉलेज अर्जुननगर येथे एमए द्वितीय वषार्त शिकत आहे. तिच्या ५० किलो वजन गटात ९६ महिला कुस्तीगीर सहभागी झाली होत्या.

तिला आंतरराष्ट्रीय कुस्ती मार्गदर्शक एनआयएस प्रशिक्षक दादासो लवटे, वस्ताद, माजी नगराध्यक्ष सुखदेव येरुडकर, दयानंद खतकर, सागर देसाई यांचे मार्गदर्शन, तर खासदार संजयदादा मंडलिक, ॲड. वीरेंद्र मंडलिक, साई राज्य समन्वयक चंद्रकांत चव्हाण, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद पुणे, कोल्हापूर जिल्हा व शहर राष्ट्रीय तालीम संघ, कोल्हापूर यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
1 6 MAR 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो जैवतंत्रज्ञान सुविधांसाठी चार कोटी २७ लाखांचा निधी मंजूर

टेंबलाईवाडी, ता. १५ : शिवाजी विद्यापीठात नॅनो जैवतंत्रज्ञान व कॅन्सरवरील संशोधनास लागणाऱ्या सुविधांसाठी भारत सरकारच्या जैव तंत्रज्ञान विभागाच्या बिल्डर योजनेंतर्गत चार कोटी २७ लाख रुपयांचा निधी मंजूर केला. या निधीतून नॅनो जैवतंत्रज्ञान व कॅन्सरवरील संशोधनास लागणारी आधुनिक व सुसज्ज प्रयोगशाळा विद्यापीठात उभारण्यात येणार आहे.

योजनेंतर्गत एकूण निधीपैकी विद्यापीठास दोन कोटी ८५ लाख रुपये मिळाले आहेत. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील पाच वर्षीय प्रकल्पाचे समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. या प्रकल्पांतर्गत डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. के. डी. पवार, डॉ. एम.एस. निंबाळकर प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक म्हणून काम पाहतील. प्रकल्प अंतर्गत विविध धातूचे, विविध आकाराचे नॅनोपार्टीकल्स तयार करणे व त्याचे भौतिक गुणधर्म तपासणे याविषयी संशोधन केले जाईल.

तसेच जीवाणू, विषाणू, वनस्पती कवक यांच्यामधील नॅनो तंत्रज्ञान व उपयुक्ततेबाबत संशोधन केले जाईल. पश्चिम घाटातील विविध वनस्पतींचा नॅनो पार्टीकल्स तयार करण्यासाठी आणि त्याच्या औषधी व शेतीपूरक वापराबाबतही संशोधन करतील.

## संशोधनाचे महत्त्व...

संशोधनामुळे विविध सजीवांचा उपयुक्त नॅनोकण निर्मिती करण्यासाठीच्या उपयोजनाबाबत भरीव माहिती मिळेल. नॅनोकण बनविणाऱ्या जीवाणूंचा शोध, नॅनोकण व नॅनोमटेरिअलचा कर्करोग, न्यूरोसायन्स अल्झायमर (स्मृतिभ्रंश), टारगेटेड ड्रग डिलिव्हरी व रिलीज, कृषी क्षेत्रासाठी उपयुक्त नॅनोमटेरिअल, नॅनो पेस्टीसाईड अनुषंगानेही संशोधन केंद्रित असेल. नॅनो तंत्रज्ञानाला पूरक स्वरूपाचे अध्ययन अध्यापन व त्यासंदर्भातील संशोधनासाठी लागणारे प्रशिक्षण कार्यशाळा, वेबिनार, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन यांचाही या प्रकल्पात अंतर्भाव आहे. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्रकुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रकल्पासाठी मार्गदर्शन मिळत आहे.

Times of India

# Space observatory at SUK to study upper atmospheric changes

Abhijeet.Patil
@timesgroup.com

**Kolhapur:** The Space Research Centre of the Shivaji University Kolhapur (SUK), which is located at Panhala, will play an instrumental role in studying the reasons for loss of satellite signals by studying the dynamics of upper atmospheric stratas.

The centre will be the third in India to have high-end spectrometers after the Physical Research Laboratory in Ahmedabad, and the Space Research Centre in Hyderabad. SUK had signed an MoU with PRL Ahmedabad in 2021. A sum of Rs 1 crore will be spent on procuring the spectrometers and other devices. SUK has allocated Rs 20 lakh for the project.

Rajiv Vhatkar, in charge of the Panhala observatory, said, "Chemical activities take place between mesosphere and thermosphere — in the 50 and 500 km stretch of the atmosphere. Ions combine and recombine due to the energy effect of cosmic and solar radiations. The ions neutralise at night. The recombination of ions causes disturbances in signals sent by satellites in Earth's orbits. We will study the radiations passing through these spheres and infer the changes."

Oxygen and nitrogen are dominant in these spheres. Vhatkar said the sudden and rapid changes cause disturbance or impart noise effect to the satellite signals and, therefore, cause loss of data. "We depend on satellite signals for many things — from finding routes using GPS to using satellite images for weather predictions. Such critical data may be lost due to rapid changes in the upper atmosphere. The inferences of our study will help technicians build more efficient satellites," he said.

Pallam Raju, dean of PRL Ahmedabad, and Vhatkar will co-ordinate for the project. SUK vice-chancellor D T Shirke said the study will aid in progress of space knowledge.